# जाहीर सुचना

## चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांचा (चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याकरिता) समुच्चय (पुल) तयार करण्यासाठी जाहिरात

चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील (चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याकरीता) नोंदीत मुख्य मालक/नियोक्त्यांना (कारखाने, आस्थापना, शासकीय निमशासकीय मंडळे, महामंडळे, कार्यालय इत्यादी) मागणीनुसार सुरक्षा रक्षक पुरविण्याकरिता ३९६ सुरक्षा रक्षकांचा समुच्चय (पूल) तयार करावयाचा आहे.

सदर समुच्चय (पूल) तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र. एसजीए-२०२४/प्र.क्र.९६/कामगार-५ दिनांक २७.०३.२०२५ अन्वये पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर समुच्चय (पुल) तयार करण्यासाठी उमेदवारांच्या पात्रतेच्या अटी **http://www.sgbregistration.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर दिनांक **०७.७.२०२६ ते ०६.०८.२०२६** चे कार्यालयीन वेळ सायंकाळी **६.१५ वाजेपर्यंत** ऑनलाईन अर्ज करावे.

**सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता आवश्यक असलेले पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे:-**

१) **वयोमर्यादा :- १.१ :-** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे पुर्ण व कमाल वय ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. **१.२ :-** वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- **०६.०८.२०२६.**

२) **शैक्षणिक पात्रता:-** वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकावेळी उमेदवाराने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

३) **अधिवास :-** सदर उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

४) **शारीरिक पात्रता:-**

| | **पुरुष उमेदवार** | **महिला उमेदवार** |
|---|---|---|
| उंची | किमान १६५ से.मी. | किमान १५८ से.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ सें.मी. न फुगवता, फुगवून ८४ सें.मी. | -------------- |

५) उपरोक्त नमूद वय, शिक्षण व शारीरिक पात्रतेच्या निकषाप्रमाणे पात्रता नसल्यास उमेदवारांचा पुढील प्रक्रियेकरिता विचार केला जाणार नाही.

**उपरोक्त निकषात बसणा-या उमेदवारांची मैदानी परीक्षा खालील प्रमाणे असेल:-**

१. मैदानी चाचणी ही एकुण १०० गुणाची असेल व मैदानी चाचणी उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहे.
२. मैदानी चाचणीमध्ये अनुत्तीर्ण अर्जदारांचा अंतिम गुणवत्ता यादीकरिता विचार केला जाणार नाही.
३. मैदानी चाचणी एकूण गुणांची बेरीज अपुर्णांकात असल्यास ती अपुर्णांकातच ठेवून, मैदानी चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.
४. **मैदानी परीक्षा:- एकुण गुण १००.**

| **अ.क्र.** | **पुरुष उमेदवार** | **महिला उमेदवार** | **गुण** | **टिप** |
|---|---|---|---|---|
| १ | १६०० मीटर धावणे | ८०० मीटर धावणे | ४० | १६०० मी अंतर पुर्ण करण्यास लागलेल्या कालावधीनुसार गुण मिळतील. याबाबत दिनांक २७.०३.२०२५ चे शासन निर्णयात विस्तृत माहीती दिलेली आहे. |
| २ | १०० मीटर धावणे | १०० मीटर धावणे | ३० | वरील प्रमाणे |
| ३ | गोळाफेक (७.२६० किलो. वजनाचा) | गोळाफेक (४ किलो वजनाचा) | ३० | ७.२६० किलाग्रॅम वजनाचा गोळा फेकण्याकरिता किती अंतर गोळा फेकला त्यानुसार गुण मिळतील. याबाबत दिनांक २७.०३.२०२५ चे शासन निर्णयात विस्तृत माहीती दिलेली आहे. |

" मैदानी परीक्षेदरम्यान काही अपघात झाल्यास अथवा अघटीत प्रसंग ओढावल्यास संबंधित मंडळ त्यास जबाबदार राहणार नाही, याची अर्जदाराने नोंद घ्यावी. तसे हमीपत्र अर्जदाराने मंडळास सादर करणे बंधनकारक राहील. हमीपत्र सादर केल्या नंतरच अर्जदारास मैदानी परीक्षेमध्ये सहभागी होता येईल."

**विशेष अर्हतेबाबत अतिरिक्त गुण :-** सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रियेत खालील विशेष अर्हताप्राप्त उमेदवारांना द्यावयाचे अतिरिक्त गुण, सदर अतिरिक्त गुण जास्तीत जास्त १० या मर्यादेपर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

१. एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) - ४ गुण
२. एन.सी.सी. (NCC)
   - अ प्रमाणपत्र - २ गुण
   - ब प्रमाणपत्र - ४ गुण
   - क प्रमाणपत्र - ६ गुण

**अर्ज शुल्क :-** उमेदवारांना अर्ज भरण्याकरिता शासन निर्णय क्र. एसजिए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५ दिनांक १०.१०.२०१८ नुसार खुल्या प्रवर्गाकरिता रुपये १००/- व टॅक्स तर मागासवर्गीय प्रवर्गाकरिता रुपये ७५ व टॅक्स निश्चीत केलेले आहे. सदर शुल्क उमेदवारांना भरणे आवश्यक राहील.

**इतर अटी व शर्ती :-** १) एका सुरक्षा रक्षक मंडळातून दुस-या सुरक्षा रक्षक मंडळात बदली करण्यास कोणताही सुरक्षा रक्षक पात्र असणार नाही.
२) सुरक्षा रक्षक वयाची ५८ वर्षे पुर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक मंडळामध्ये कार्यरत राहील, त्यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा रक्षक म्हणून काम करता येणार नाही.
३) ज्या आस्थापनेने सुरक्षा रक्षक मंडळाकडे सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत मागणी केली असेल त्या आस्थापनेसाठी ज्यांची जमीन संपादित झाली आहे अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील घटकांच्या पात्र उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
४) सदर समुच्चय (पूल) तयार करणे हि थेट भरती नाही, त्यामुळे समुच्चयासाठी पात्र उमेदवारांना नोकरीची हमी देता येणार नाही. मात्र ज्या प्रमाणात आस्थापनांकडून मागणी उपलब्ध होईल, त्यानुसार पात्र सुरक्षा रक्षकांना मंडळाचे कार्यक्षेत्रांतर्गत (चंद्रपूर व गडचिरोली) कामासाठी वितरीत केले जाईल.
५) सदर प्रक्रीया पारदर्शक संगणकीकृत होणार असून इच्छुक उमेदवारांनी त्रयस्थ व्यक्तींच्या कोणत्याही प्रलोभणास बळी पडु नये किंवा संपर्क करु नये असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**टिप :-** ज्या उमेदवारांनी सुरक्षा रक्षकाच्या नोंदणी/ भरतीकरीता यापूर्वी चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर मध्ये ऑनलाईन अर्ज केलेले आहे त्यांनी देखील पुन्हा नव्याने ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

स्वा/-
(प्र.भि. कावळे)
अध्यक्ष
चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर

Scanned with OKEN Scanner